# प्रकाशमार्ग

Volume 4 Issue 1 OCTOBER 2011 Rs. 15

प्रकाशकार्याचे वृत्तपत्र



महर्षी अमर (१९१९–१९८२)

ऋषींनी शिकवले तसे
आम्ही ध्यान शिकवतो.

### प्रकाश

सृष्टीमागील बुद्धिमान शक्ती आहे. प्रकाश म्हणजे स्वतः परमेश्वरच.

### प्रकाशकार्य

सर्वोत्तम जीवन जगण्यासाठी, सर्व जीवांना त्यांच्या जाणीवेची आणि अनुभवाची पातळी उंचावण्यात मदत करणे आहे.

### प्रकाशजीव

या आणि उच्च जगात राहणारे ऋषी आहेत. ते ज्ञानाचा प्रकाश आणि शक्ती गोळा करतात आणि पसरवतात.

### सप्तऋषी

सर्वोच्च आध्यात्मिक अधिकारी आहेत. ते निवडलेले महात्मे आहेत. ते, सर्व जीवांना इथे शांती आणि परिपूर्णतेचे जीवन जगण्यासाठी आणि त्यांचे मूळ म्हणजे प्रकाशाकडे परत जाण्यासाठी त्यांचे मार्गदर्शन करतात.

### महर्षी अमर

प्रत्यक्ष सप्तर्षींच्या संपर्कात असणारे एक विशेष महात्मे होते. त्यांनी उच्च जीवनाच्या सत्ययुगासाठी ज्ञान आणि मार्गदर्शक सूचना उच्च जगातून पृथ्वीवर आणल्या.

### गुरुजी कृष्णानंद

महर्षी अमरांचे पट्टशिष्य आहेत. त्यांनी ऋषींचा मार्ग, सप्तर्षी ध्यानयोग विकसित केला आणि तपोनगरात सप्तर्षींच्या आध्यात्मिक केंद्राची स्थापना केली.

### सप्तर्षी ध्यानयोग

हा लौकिक आणि आध्यात्मिक जीवन योग्य रीतीने जगण्यासाठी ऋषींनी शिकवलेला ध्यानाचा आणि भावनांना व विचारांना सकारात्मक बनविण्याचा एक अद्वितीय मार्ग आहे.

### दृढ वचन

- ★ आपण एकाच दिव्य प्रकाशाचे (परमेश्वराचे) कण आहोत.
- ★ प्रेम हा आपला स्वभाव आहे.
- ★ शांतता ही आपली भाषा आहे
- ★ ध्यान हा आपला मार्ग आहे
- ★ हे जग आपले आश्रयस्थान आहे
- ★ सर्व सृष्टीच आपलं कुटुंब आहे
- ★ परमेश्वर आपला गुरु आहे; ऋषी आपले मार्गदर्शक आहेत.

## चिंतन

महर्षी कृष्णानंद, अनुवाद : जयंत देशपांडे

मी पुष्कळ काळापासून हे पाहातो आहे. आपण ज्या भावना मनात बाळगतो, जे विचार करतो, ते आपल्या बाह्य जीवनात साकार होतात. आपण जर आतून आनंदी असलो तर बाहेरही आनंद असतो. आपण जर आंतरिक शांती अनुभवत असलो तर बाहेरही शांती असते. आपल्या मनात जर राग असेल तर आपले बाह्य जीवन अशांत होते. आपण जर आपल्या अंतरंगात खूप नकारात्मकता बाळगली तर बाह्य जीवनात अपघातांच्या रूपात सुद्धा ती प्रकट होऊ शकते. थोडक्यात म्हणजे आपण स्वतःच आपली नियती घडवत असतो.

आपल्या पूर्वायुष्यांतील आपल्या कर्मांमुळे आपली नियती निर्माण होते. पण ध्यान करून आपला जीवन–मार्ग बदलून आपण आपली नियती बदलू शकतो. आपल्या दैनंदिन जीवनातून आपण नवनवे जीवन–मार्ग बनवत असतो, नव्या नियती घडवत असतो.

आपण एकटे नाही. या पृथ्वीवर आपण एकमेकांशी जोडलेले आहोत. केवळ इतर सर्व मानवांशीच नाही तर या पृथ्वीवरील इतर सर्व जीवनाशी आपण जोडलेले आहोत. निसर्गाशी, पर्यावरणाशी आणि या पृथ्वीवर कार्यरत असलेल्या सर्व ऊर्जांशी आपण जोडलेले आहोत. आपण जेव्हा आपली वैयक्तिक नियती घडवत असतो, तेव्हा या संपूर्ण पृथ्वीच्या सामूहिक नियतीवर सुद्धा त्याचा परिणाम होत असतो. हिमालयात आणि इतर ठिकाणी ध्यानस्थ असलेल्या ऋषींना या गोष्टींची स्पष्ट कल्पना आहे. म्हणूनच ते ध्यान करण्यात आणि या पृथ्वीवर शांती आणि सद्भावना निर्माण करण्यात त्यांचे आयुष्य घालवतात.

विविध व्यवस्थांचे नियमन करणारे सत्ताधारी लोक लोभ आणि हिंसेच्या आहारी जात आहेत. ते दुःख आणि वेदना निर्माण करीत आहेत. या गोष्टींच्या निर्मितीत त्यांचा वाटा इतका मोठा आहे की, ध्यानसाधकांच्या ध्यानाचा आणि जनकल्याण–ऊर्जांचा त्यांच्यावर काहीच परिणाम होत नाही, असे वाटत आहे.

आपल्याला माहीत आहे की, आपण अंधकाराच्या युगातून प्रकाशयुगाकडे वाटचाल करीत आहोत. जास्तीत जास्त लोक आता जागृत होत आहेत. जास्तीत जास्त लोक आता ध्यान करीत आहेत आणि परिवर्तनाच्या प्रक्रियांना बळकटी देत आहेत. नव्या नियतींची घडण होणाऱ्या या काळात या पृथ्वीवरील प्रत्येक नागरिकाचे हे कर्तव्य आहे की, त्याने त्याच्या भावना व विचारांतून नवयुगासाठी पोषक वातावरण तयार करावे. शांती व विपुलतेकडे नेणाऱ्या सूक्ष्म प्रक्रियांबद्दल आपण जाणून घ्यायला हवे आणि जाणीव पूर्वक नवयुगासाठी कार्य करायला हवे.

ही पृथ्वी आपली आहे, हा आपला आसरा आहे. आपण पृथ्वीवर शांती ठेवून शांतीने जगायला हवे. जरी या गोष्टींवर विश्वास ठेवणे कठीण असले तरी हे खरे आहे की, आपण युद्ध टाळू शकतो, भूकंप आणि सर्व प्रकारचे दुःख टाळू शकतो. या वास्तवाबद्दल आपण जागृत व्हायला हवे. चला आपण शांती आणि सद्भावना निर्माण करू या. ■

मानसा फाउंडेशन (रजि.)
तपोनगर, चिक्कगुब्बि, (ऑफ हेन्नूर–बागलूर रोड) बंगलोर अर्बन ५६० ०७७. इंडिया.
फोन : (०८०) २८४६५२८०, २२७१५५०१, ९३४२० ३०२५० (सकाळी १० ते दु. ४ पर्यंत)
इ–मेल : info@lightagemasters.com वेबसाईट : www.lightagemasters.com

## ध्यान वर्ग

### तपोनगरात फक्त दर रविवारी भरतो

प्राथमिक पातळी – सकाळी १० वाजता

### बंगलोर शहरातील केंद्रांमधे वर्ग खालीलप्रमाणे भरतात

**दर रविवारी** (सकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर सोमवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
अंजनेय मंदिर, महालक्ष्मी लेआऊट

**दर मंगळवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
श्री ऑरोबिंदो कॉम्प्लेक्स, फेज १,
जे.पी. नगर

**दर बुधवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
आर्य समाज, सी.एम.एच. रोड, इंदिरानगर
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम
मारुति मंदिर, विजयनगर

**दर गुरुवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
देवगिरी वेंकटेश्वर मंदिर, बनशंकरी स्टेज २

**दर शुक्रवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
इंडियन हॅरिटेज अकॅडमी, ब्लॉक६,
कोरामंगला

**दर शनिवारी** (संध्याकाळी ७ वाजता)
हिमांशु, ४ मेन, मल्लेश्वरम

### आनेकल येथे

**दर सोमवारी** (संध्याकाळी ६ वाजता)

**दर मंगळवारी** (सकाळी ६ वाजता)

बाहेरील विद्यार्थ्यांसाठी पोस्टाद्वारे किंवा ई–मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. अधिक माहिती साठी पान ६ वरील पहिला कॉलम वाचावा.

Doorways (इंग्रजीत) /
तपोवाणी (कन्नड) / प्रकाशमार्ग (मराठी)
वार्षिक वर्गणी रू. २००/–
ड्राफ्ट कृपया मानसा लाइट
एज फाउंडेशन च्या नावाने काढावा.
कृपया 'मनी ऑर्डर' ने पैसे पाठवू नये.

### वृत्तपत्र

आपल्या मित्राला भेट करावे. वर्गणी सोबत, त्यांचं नाव व पत्ता आमच्याकडे पाठवावा.



२८ ऑगस्ट, तपोनगर, महर्षी अमर महासमाधी कार्यक्रम – गुरुजी साधकांना संबोधित करताना

### काही ठळक घडामोडी

- २८–८–२०११ रोजी तपोनगरात आयोजित केलेल्या महर्षी अमरांच्या महासमाधी कार्यक्रमात ४०० पेक्षा अधिक लोकांनी भाग घेतला.
- २८–८–२०११ रोजी तपोनगरात महर्षी अमरांच्या महासमाधी निमित्त झालेल्या कार्यक्रमाच्या प्रसंगी "Guruji Speaks - Vol 4", "iGuruji - Vol 5" आणि "New Age Realities" ह्या पुस्तकाचा कन्नड भाषेतील अनुवाद, अशी तीन पुस्तके प्रकाशित करण्यात आली.
- पुस्तके आपण वेबसाइट वरून ऑनलाइन किंवा मानसा लाइट एज फाउंडेशन च्या नावाने ड्राफ्ट पाठवून विकत घेऊ शकता.
- आपल्या सर्व विद्यार्थ्यांकडे आपले मासिकपत्र असायला हवे. मार्गदर्शनाची मुदत वाढवण्यासाठी आमचे स्मरणपत्र मिळाल्यावर कृपया ताबडतोब नूतनीकरण करावे.

### तपोनगरातील कार्यक्रम

| | | |
|---|---|---|
| दर रविवारी | – व्याख्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत | |
| | – विशेष ध्यान आणि प्रकाश प्रवहन, मध्यान्ह १२ ते दुपारी १ पर्यंत | |
| रविवार ३० | – अखंड ध्यान सकाळी ११ ते १२ पर्यंत | |

गुरुजींच्या व्याख्यानांच्या DVDs एका विशेष ग्रुपच्या सदस्यांसाठी दर महिन्याला उपलब्ध राहतील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी संपर्क साधावा.

गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानाचे, इंटरनेटवरून प्रत्यक्ष प्रसारण विद्यार्थ्यांकरता उपलब्ध राहील. सविस्तर माहितीसाठी कृपया मानसा कार्यालयाशी ई–मेल द्वारा संपर्क साधावा.

### ध्यानासाठी विशेष दिवस

| | | |
|---|---|---|
| ०३ | सोमवार | सरस्वती पूजन |
| ०४ | मंगळवार | दुर्गाष्टमी |
| ०५ | बुधवार | महानवमी<br>आयुध पूजा |
| ०६ | गुरुवार | विजयादशमी |
| ११ | मंगळवार | पौर्णिमा |
| २० | गुरुवार | कृष्णाष्टमी |
| २५ | मंगळवार | नरक चतुर्दशी<br>शिवरात्री |
| २६ | बुधवार | अमावास्या<br>महालक्ष्मी पूजन |
| २७ | गुरुवार | दिवाळी |

भारताबाहेर राहाणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांसाठी आता इंटरनॅशनल क्रेडिट कार्ड वापरून आपल्या वेबसाइट www.lightagemasters.com द्वारे फी भरण्याची व पुस्तके विकत घेण्याची सुविधा उपलब्ध आहे.

स्पीकिंग ट्री वर मास्टर्सच्या सूचीत गुरुजींचे नाव आले आहे. त्यांचे ब्लॉग वाचण्यासाठी व व्हीडियो पाहण्यासाठी कृपया www.speakingtree.in या वेबसाइटला भेट द्यावी.

गुरुजींसोबत अनौपचारिक बैठक शनिवार, ८–१०–२०११ रोजी सकाळी ११ ते दुपारी १ पर्यंत आयोजित करण्यात येईल. ह्यात भाग घेण्याची इच्छा असणाऱ्यांनी मानसा कार्यालयात आपले नाव नोंदवावे.

## “लाईट चॅनल्स वर्ल्ड मूव्हमेंट” बद्दल वृत्तांत

- प्रकाश नियती बदलू शकतो. शाळेतील मुले जेव्हा त्यांच्या लहान व मोठ्या समस्यांसाठी उपाय मिळवायला प्रकाशाचा उपयोग करतात तेव्हा आपण हे पाहातो. ते अभ्यासात सुधारणा करण्यासाठी, परस्पर संबंध सुधारण्यासाठी आणि त्यांच्या शाळासोबत्यांना बरे करण्यासाठी देखील प्रकाशाची मदत घेतात. त्यांना कदाचित हे माहीत नसेल की मूकपणे प्रकाशाचे प्रवहन करून ते ह्या जगाची नियती घडविण्यात सार्थपणे सहभागी होत आहेत.
- २००० शाळांतील १७ लाखांपेक्षा अधिक मुलांनी निदान एकदा तरी प्रकाशाचे प्रवहन केले आहे. यांमधील पुष्कळ मुले वारंवार प्रवहन करतात आणि ४०० पेक्षा जास्त शाळांतील २ लाखांहून अधिक मुले दररोज त्यांच्या शाळेच्या प्रार्थनेसमयी प्रकाश प्रवाहित करतात.
- गेल्या महिन्यात मैसूर येथे आणखी एक नियमित प्रकाश प्रवहन केंद्र सुरू करण्यात आले. ■

## प्रकाश प्रवहनाचे अनुभव

पूर्वी मी निवांतपणे अभ्यास करू शकत नव्हतो. मी दोन–तीन विषयांत नापास व्हायचो. आता मी सर्व विषयांमध्ये पास झालो आहे. मला हे सांगायचे आहे की हे ध्यानामुळे शक्य झाले. आता ध्यान करत असल्यामुळे मी आनंदात आहे.

– प्रसन्ना के., वर्ग ९, श्रेयस हाय स्कूल, बंगलोर

मी अभ्यास सुरू करायच्या आधी सुमारे ५ मिनिटे प्रकाश प्रवहनाचा सराव करते. ह्यामुळे मला नेहमीच खूप धीर, शांती आणि आनंद मिळाला आहे.

– पूर्णाश्री मंजुनाथ, विद्यार्थिनी, वर्ग६

मला जाणीव आहे की तुम्ही डिसेंबर २०१० मध्ये आयोजित केलेल्या ध्यान कार्यक्रमामुळे आमच्या शाळेतील विद्यार्थ्यांना त्यांची एकाग्रता व मनाचे स्थैर्य सुधारण्यासाठी आणि सर्व बाजूने विकास करण्यासाठी अपरिमित मदत मिळाली आहे. आमच्या गेल्या वर्षीच्या दहावीच्या निकालावर (८९%) देखील ह्याचा प्रभाव पडला.

– लाजू पी. नाईक, मुख्याध्यापिका, श्रेयस हाय स्कूल, बंगलोर

## तपोनगर डायरी

सीमा अलमेल, अनुवाद : पूर्वा फडके

देवी महालक्ष्मीच्या दहा दिवसांच्या पृथ्वीवरील वास्तव्यात तपोनगरवासीयांनी आपल्या घरामध्ये व हृदयामध्ये तिचे स्वागत केले. प्रकाशरूपाने ती प्रत्येक घरात वास्तव्य करेल या जाणिवेने त्या दिवसांना खास बनवले. त्यानंतर लगेचच श्रीकृष्णजन्माष्टमी निमित्त आयोजित केलेला ध्यानसत्राचा व भगवान श्रीकृष्णांच्या दहा दिवसांच्या निवासाचा लाभ प्रत्येक परिवाराने घेतला. या दैवी व्यक्तिमत्त्वांनी तपोनगरवासी होऊन इथल्या वास्तव्याचा आनंद नक्कीच लुटला असणार अशी आम्हाला खात्री आहे.

२५ ऑगस्टला अमर महर्षींचा महासमाधी दिवस होता. आठवड्यातील हा कामकाजाचा दिवस असल्याने साधकांना नोकरीतून सुट्टी लागू नये यासाठी तो पुढच्या रविवारी साजरा करण्यात आला. ऋषींचा समजूतदारपणा व त्यांना आपल्याबद्दल वाटणारी काळजी यावर आपण कितीही बोललो तरी ते कमीच आहे! एखाद्याला ऑफिसमध्ये सुट्टीचा अर्ज करून ती मिळवण्यासाठी किती ताण येऊ शकतो हे त्यांना समजते आणि म्हणूनच ते तारखेपेक्षा भावनांना जास्त महत्त्व देतात.

अमर महर्षींच्या महासमाधी निमित्त तीन पुस्तके प्रकाशित करण्यात आली. उपस्थित प्रत्येक साधकाने गुरुजींची प्रत्यक्ष भेट घेऊन आशीर्वाद प्राप्त केले. ई–मार्गदर्शन घेणाऱ्या पुण्याच्या २० साधकांच्या समूहाने गुरुजींची अनौपचारिक भेट घेतली. तासाभराच्या या भेटीत प्रत्येकाला मार्गदर्शन मिळाले. त्यांनी गुरुजींबद्दलचे प्रेम व कृतज्ञता व्यक्त केली. त्यांना गुरुजींकडून वचनरूपी आशीर्वाद मिळाला की जेव्हा जेव्हा ते येथे समूहाने येतील तेव्हा तेव्हा गुरुजीही त्यांना अवश्य भेटतील. त्यामुळे प्रत्येकाच्या चेहेऱ्यावर अवर्णनीय आनंद दिसत होता.

अखेर वरुण देवतेने या क्षेत्रावर कृपादृष्टी दाखविली. जवळपासच्या बऱ्याच शेतकऱ्यांची नांगरणी करून आता पेरणीस सुरुवात केली आहे. मागील तीन वर्षांतील अनियमित पावसाने बऱ्याच शेतजमिनी ओसाड झाल्या व कचऱ्याने भरून गेल्या होत्या. पण या वर्षीच्या पावसाने शेतकऱ्यांना बराच दिलासा दिला.

शनिवारी सायंकाळी अंजनेय मंदिरात गुरुजींबरोबर ध्यान करण्याच्या खास संधीचा फायदा तपोनगरवासी घेतात. गावातील लोकांनी दिलेल्या प्रसादाचा आस्वाद लुटत ते एकमेकांसोबत आनंदाचे काही क्षण व्यतीत करतात. ■

## प्रकाश प्रवहनाची जागतिक चळवळ

ही आपल्या अंतःकरणाची चळवळ आहे. ह्या जगाला प्रेम व शांतीने परिपूर्ण अशी सुंदर जागा बनविण्यासाठी ही चळवळ आहे. एक अशी चळवळ जिच्यात प्रवचने नाहीत की घोषणा फलक नाहीत. एक अशी चळवळ जिच्यामध्ये प्रकाश उच्च जगातून प्रवाहित करून पृथ्वीतलावर आणणे व पसरवणे एवढेच पुरेसे आहे. प्रकाशाला प्रवाहित करा. मग शब्द जे करू शकत नाहीत ते सर्व तो प्रकाशच करेल.

आपण जेव्हा प्रकाश प्रवाहित करून पसरवतो तेव्हा तो इतरांच्या हृदयांत व घरात प्रवेश करतो आणि त्यांच्या भावना व विचारांत असलेल्या अंधःकाराला दूर करतो. त्यामुळे माणसांत परिवर्तन घडते. माणसांमधील परिवर्तनामुळे जगात परिवर्तन घडते आणि ते प्रकाशमय बनते.

हा चर्मचक्षूंना दिसणारा साधा प्रकाश नसून शक्तीच्या गाभ्यापासून येणारा अतिसूक्ष्म प्रकाश आहे. या मूलस्त्रोतातूनच सर्व सृष्टीचा जन्म झाला. ह्या प्रकाशाजवळ सर्व काही आहे: शक्ती, विवेक आणि उज्वल भविष्य. आणि तो अदृश्यपणे सर्वत्र वास करून आहे.

आपण चॅनलिंग म्हणजे प्रवहन करून ह्या प्रकाशाला पृथ्वीवर आणून सर्वत्र पसरवूया. रोज सकाळी उठल्यावर आणि रात्री निजण्यापूर्वी ७ मिनिटे आपण हे करून ह्या जगाचे परिवर्तन करूया.

ह्या जागतिक चळवळीची सुरुवात १८–०५–२००८ रोजी तारामंडळीय परिषदेने म्हणजेच सप्तर्षींनी गुरुजी कृष्णानंदांच्या मार्फत केली.

हा संदेश सर्वांपर्यंत पोहोचवा.

वेब साईट : www.lightchannels.com

## शंबला तत्त्वे

**ही प्राचीन ऋषींनी दिलेली सात तत्त्वे आहेत ज्यांचे पालन शंबला या पृथ्वीवरील प्रकाशाच्या नगरीत राहाणारे लोक करतात. हे लोक चिरतरुण असून शांती व परिपूर्णतेचे जीवन जगतात.**

१. तुमच्या अंतरंगातील प्रकाशाचा अनुभव घेऊन सभोवताली पसरवा.

२. प्रेमाचा अनुभव घ्या आणि प्रेम सर्वत्र पसरवा.

३. प्रत्येक जीवामध्ये आणि प्रत्येक वस्तूमध्ये जीवनाच्या एकात्मतेचा अनुभव घ्या.

४. दैनंदिन कामे करण्याआधी प्रथम त्यांची मनात उजळणी करा, नंतर हळू आवाजात त्यांचे शब्दांकन करा आणि नंतरच ती कृतीत उतरवा.

५. कोणतेही ध्येय पूर्ण होण्याआधी त्याविषयी कमीत कमी बोलून गुप्ततेचा नियम पाळा.

६. नकारात्मकतांशी लढा देण्यासाठी शरीर, मन आणि बुद्धीला चालना द्या.

७. उच्च आध्यात्मिक ध्येये गाठण्यासाठी स्वतःहून आपल्या लौकिक गरजांची मर्यादा ठरवा.

# गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

०७-०८-२०११

जेव्हा तुमच्या मनात शंका असतील किंवा तुम्ही अस्वस्थ असाल तेव्हा ३ ते ५ मिनिटे प्रकाशाच्या महासागराचा अनुभव घ्या. बौद्धिक पातळीवरून आपल्याला अनुभवाच्या क्षेत्रात जायला हवे. असे केल्यानंतरच साधनेला सुरुवात होते.

ईश्वर, प्रकाश किंवा उच्च प्रज्ञा सर्वत्र व्यापून आहे. तुम्ही ईश्वराशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केलेला नाही. डोळे उघडे ठेवून किंवा मिटून तुमची जाणीव वर न्यायचा आणि ईश्वरी अस्तित्वाची जाणीव करून घ्यायचा प्रयत्न करा. तत्क्षणी तुमचा संपर्क घडेल.

सुरक्षाकवच आपले फक्त रक्षणच करते असे नाही, तर आपल्यावर देखरेख ठेवून मार्गदर्शनही करते, कारण ते स्वयंप्रज्ञ असते. आपण आपल्या सुरक्षाकवचाची आठवण ठेवून त्याच्याशी सतत संवाद केला पाहिजे.

प्रलयकाळ हा जलद आध्यात्मिक प्रगती करण्यासाठी उत्तम काळ असतो, कारण त्यावेळी आपल्यासाठी विशेष संधी, विशेष ऊर्जा आणि विशेष मदत उपलब्ध असते. यावर विचार करा.

लोक साधना सुरू करतात. काहीजण त्याचे जगाला प्रदर्शन करतात. महर्षी अमर आम्हाला सांगत की जंगलात जेव्हा एखादे फूल फुलते ते कोणालाही माहीत नसते. ते तसे जाहीर करत नाही. तसेच, आपण आपले आयुष्य सामान्यपणे, धीमेपणाने, समंजसपणे व काळजीपूर्वक व्यतीत करावे. त्यातच मोठा गौरव आहे.

सध्याचा काळ असा आहे की चांगल्या तसेच वाईट गोष्टीही तळापासून पृष्ठभागावर येतील. जर काही वाईट बाहेर आले तर त्याचा सामना करा, त्याच्याशी दोन हात करा व ते निपटून टाका. याकरिता तुम्हाला संपूर्ण विश्वाकडून मदत मिळेल. हा आहे आध्यात्मिक दृष्टिकोन.

ध्यानधारणा श्वसनक्रियेप्रमाणे आपल्या आयुष्याचा भाग बनली पाहिजे. साधनेला मुळीच विसंबू नका. प्रयत्न कधीही सोडू नका.

कधी काहीबाही वाईट कानावर येते. तेव्हा तुम्ही अस्वस्थ होता उपयोगी नाही. तुम्ही त्या ब्रह्मराक्षसाला समोरून भिडले पाहिजे. हा सर्व मनाचा खेळ आहे. तुम्हाला कोणत्याही गोष्टीला व कोणत्याही व्यक्तीला टाळायची गरज नाही. तुम्ही बलवान आहात. ऋषींचे तुमच्यावर लक्ष आहे व ते तुमचे रक्षण करीत आहेत. तुम्ही जर दुर्बल झालात तर तुम्ही वाईट शक्तींना तुमच्यामध्ये प्रवेश करण्यासाठी मार्ग खुला करता.

सर्व प्रकाश कार्यकर्त्यांचे एकच जाळे विणण्याचे आम्ही ऐहिक पातळीवर प्रयत्न केले, सूक्ष्म पातळीवर सुद्धा भरपूर प्रयत्न केले. असे जाळे विणू पाहिले, जे संपूर्ण जगासाठी आध्यात्मिक समिती बनू शकेल, जी केवळ माणसांनाच नव्हे तर सर्व राष्ट्रांना मार्गदर्शन करेल. परंतु आम्हाला त्यात यश आले नाही कारण उद्दिष्टांचा संगम होऊ शकला नाही. सर्व प्रकाश कार्यकर्ते अप्रतिम लोक आहेत, पण आम्ही हातमिळवणी करून एकत्र कार्य करू शकत नाही. हे फार खेदजनक आहे. यावरून हेच सूचित होते की आपण अजून म्हणावे तितके प्रगत झालेलो नाही.

आपण २०१२ सालाच्या जवळ चाललो आहोत. अशा काळात लोकांना मार्गदर्शन देण्यासाठी ऋषींनी १४४ लोकांची निवडसुद्धा केली आहे, ज्यांना यासाठी विशेष प्रशिक्षण देऊन तयार करण्यात येत आहे. लक्षात ठेवा की सर्वांनी आपापल्या परीने प्रयत्न करण्याची वेळ जवळ येऊन ठेपली आहे. निराश होऊ नका. मला आशा दिसते आहे. ऋषींचे प्रयत्न चालू आहेत. त्यामुळे विध्वंस कमीतकमी होईल.

१४-०८-२०११

आपण जर कधीही शांतीचा अनुभव घेतला नसेल तर त्यावरून असे दिसते की आपण ध्यान योग्य रीतीने केले नाही. आपण ध्यान करताना कधी ना कधी, अगदी ओझरत्या क्षणांसाठी का होईना पण शांतीचा अनुभव नक्कीच घेतला असणार. आपण ध्यानाचा प्रभाव तसाच टिकू दिला पाहिजे. तुम्ही प्रामाणिक असाल तर तुम्हाला ध्यानाचा अर्थ नक्कीच समजतो, तुम्ही ध्यान करता आणि पुढे जाता. तुमचा पूजा व धार्मिक विधींवर विश्वास असेल तर तिथेही प्रामाणिक राहा. मंत्रांचा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न करा. कलोपासना असूदे, पुस्तकांचे वाचन असूदे की खोलीची सफाई असूदे, आयुष्यात जे काही कराल ती प्रत्येक गोष्ट मनापासून करा.

आपल्या दिवंगत आप्तांच्या पुण्यतिथीदिवशी आपण धार्मिक विधी करतो. आपल्यापैकी काहीजण त्यांना ऊर्जा अर्पण करतात ज्या, त्या त्या व्यक्तींपर्यंत नेऊन पोचविण्यात येतात. दिवंगत व्यक्तींना आपण निरोप पाठवू शकत नाही. फार क्वचित असा निरोप पोचविला जातो व ते निरोपाच्या स्वरूपावर अवलंबून असते. तो निरोप त्यांच्याकडे खूप खोल पातळीवर, सूक्ष्म स्तरावर पोचतो. त्यांना कदाचित त्याची जाणीव होत नाही. जरी कठीण वाटले तरी कधीनाकधी आपल्याला स्वीकारावेच लागते की मृत्यूनंतर संबंध तुटतो, हेच सत्य आहे. फारच क्वचित आपली दिवंगत व्यक्तीशी पुनर्भेट होते, पण सहसा तसे होत नाही. जन्मोजन्मीचे सोबती फक्त याला अपवाद असतात. मृतात्म्याशी मानसिक दुवा साधण्यास व देवाणघेवाण करण्यास परवानगी नसते.

आपल्या आयुष्यात जेव्हा म्हणून आडवा रस्ता लागतो त्या प्रत्येक वेळी आपण योग्य दिशेला वळण्याची निवड करू शकतो. आपण चुकीचे वळण घेतल्यानंतर सुद्धा जर आपण वाट पाहिली तर योग्य वळणावर जाण्यासाठी आपल्याला अजून एक संधी मिळू शकते.

महालक्ष्मी समृद्धीची देवता आहे. तिच्यापाशी ऐहिक व पारमार्थिक संपदा आहे आणि ज्ञान व इतर अनेक गोष्टी आहेत. ती आपल्याला वैराग्याचे म्हणजेच अलिप्ततेचे दान देऊ शकते. तिने एकदा अमरांना सांगितले की ती प्रत्येकाची इच्छा पूरी करते, पण त्यासाठी एक नियम आहे : 'तुम्हाला ऐहिक फायद्यांबरोबरच पारमार्थिक फायदे सुद्धा मागावे लागतात.'

एका स्त्रीने पाहिले की एका मोठ्या संमेलनात दुष्ट शक्तींचे दूत त्यांच्या काळ्या ऊर्जा जमलेल्या सर्व लोकांच्या शरीरात संक्रमित करीत होते. ती म्हणाली, 'माझ्या ध्यानात व्यत्यय आल्यामुळे मी ध्यान करू शकले नाही.' नंतर तिने पाहिले की महर्षी अमर त्या सर्व काळ्या ऊर्जा निपटून टाकून त्यांच्या जागी चांगल्या ऊर्जा भरत होते. त्या दृष्टांतानंतर ती स्त्री ध्यान करू शकली. हे सर्व तिच्या कल्पनेने उभे केलेले चित्र होते. तुम्हाला एखादा अनुभव येतो तेव्हा त्याचा आनंद जरूर घ्या, पण त्याच्या पलीकडे जा.

२१-०८-२०११

प्रकाशाच्या महासागराचा अनुभव आपल्याला खूप शांती देतो. आपण जेव्हा स्वस्थ आणि शांत असतो तेव्हा आपल्याला वास्तव सुस्पष्टपणे व यथार्थपणे समजते. प्रकाश सुद्धा आपल्याला शक्ती व शहाणपण

## गुरुजी उवाच

(गुरुजींच्या रविवारच्या व्याख्यानातील वेचे)
(संकलन: शोभा राव; अनुवाद: पूर्णिमा परुळेकर)

देतो, ज्यामुळे आपण सत्याचा स्वीकार करून ते प्रत्यक्ष जगू शकतो.

आपल्या देशातील भ्रष्टाचार विरोधी मोहीम ही स्वतंत्र, मुख्य प्रवाहापासून तुटलेली व एकांडी चळवळ नाही. ती एका मोठ्या अखंड आध्यात्मिक प्रक्रियेचा एक भाग आहे. ही प्रलयाची संक्रमणाची प्रक्रिया आहे ज्यामध्ये भ्रष्टाचार, हुकूमशाही आणि सत्तेचा गैरवापर यांना तीव्र नापसंती व विरोध आहे. नवीन ऊर्जा व अनेक लोकांनी प्रवाहित केलेला प्रकाश यांचा या आंदोलनावर प्रभाव पडतो आहे. ऋषींचा संदेश नि:संदिग्ध व सुस्पष्ट आहे की आपापल्या शांत कोपऱ्यात बसून आपण प्रकाश प्रवाहित करणे गरजेचे आहे, जो नवयुगाच्या उभारणीसाठी ह्या क्रांतीला पुढे नेईल व बळकटी देईल.

एकदा का तुम्ही ऋषींच्या मार्गदर्शनाखाली साधनेला आरंभ करून साधना करत राहिलात की तुम्ही ऋषींच्या संपर्क यंत्रणेशी जोडले जाता. महान प्रज्ञाशक्ती तुमच्यावर सतत लक्ष ठेवून तुम्हाला मदत करतात. त्यामुळेच तुमच्या मनात प्रश्न उत्पन्न झाला की त्याचे उत्तर सुद्धा तयार होते. कधीकधी उत्तर तुमच्यापर्यंत पोहोचते किंवा कधी प्रश्न संपर्क यंत्रणेत प्रवेश करतो आणि तुम्ही न विचारताही तुम्हाला प्रश्नाचे उत्तर मिळते.

कधीकधी ध्यान करताना आपल्या लक्षात येते की आपला मंत्रजप थांबला आहे. असे घडणे योग्य असते कारण तेव्हा आपली जाणीव मनाच्या पलीकडे जाते. मंत्रजप थांबल्याचे लक्षात आल्यावर पुन्हा तुम्ही मंत्रजपाकडे वळू शकता. एक तासाच्या ध्यानामध्ये अनेकदा अशा तऱ्हेचे खंड पडू शकतात. ध्यानामध्ये आपण प्रकाश पाहू शकत नाही. आपण प्रकाशाचा अनुभव घेण्यावर लक्ष केंद्रित करावे.

ईश्वर अतर्क्य पद्धतींनी मदत करतो. जे ऋषींच्या यंत्रणेत नाहीत अशांनासुद्धा तो मदत करतो. आपल्या ते ध्यानात येत नाही.

प्रत्येक तपासणी ही एकप्रकारे दीक्षाच असते. आपल्याला नेहमीच ऊर्जेची ताजी टवटवीत मात्रा देण्यात येते. त्यामुळे जाणीव वरच्या पायरीवर जाते. जरी तुमचे ध्यान नियमित होत नसेल तरी तुम्ही तपासणीसाठी येत चला. त्याचा तुम्हाला फायदा होतो. अशा वेळी ऋषींच्या जर लक्षात आले की काही समस्येमुळे किंवा पूर्वकर्मांमुळे तुमच्या ध्यानात अडथळा येत आहे तर ऋषी ते अडथळे दूर करतात. कधीकधी जर आपण ध्यान चांगले केले असेल तर ऋषी आपल्याला बक्षीस देतात.

१४४००० ऋषी व त्यांची केंद्रे मिळून ऋषींच्या यंत्रणेचे जाळे बनते. महर्षी अमर जसे आपल्यामध्ये राहात होते तसेच हे सर्व ऋषी सुद्धा लोकांमध्येच राहातात. त्यांची वसती संपूर्ण जगभर आहे.

समाधी साध्य करण्याचा कोणताही सोपा, आडमार्ग नाही. खूपदा लोक गोंधळून जातात. आपल्या उद्दिष्टाविषयी स्पष्ट असणे फार महत्त्वाचे आहे. साधनेचा कोणताही मार्ग निवडा; त्याला धरून राहा. अंती सर्व मार्ग ईश्वराकडे नेतात.

२८–०८–२०११

मला हे पाहून आनंद होतो की आपण महर्षी अमरांचा सन्मान करतो, ऊर्जा अर्पण करून आपण त्यांची पूजा करतो, तसेच त्यांचे अनुसरणही करतो. आपण त्यांची शिकवण समजून घेण्याचा प्रयत्न करतो. आपण कधीही त्यांना देव बनवून देव्हाऱ्यात बसवणार नाही. महर्षी अमर साक्षात सत्य आहेत. आपण जेव्हा त्यांचे व त्यांच्या शिकवणीचे आपल्या आचरणातून प्रकटीकरण करतो, तीच आपण त्यांना दिलेली सर्वोत्तम गुरुदक्षिणा असते.

महर्षी अमरांनी आपल्याला जाणीव करून दिली की सर्व ऋषी वास्तवात आहेत आणि त्यांच्याशी संपर्क होऊ शकतो. त्यांनी पृथ्वीवर आणलेले ज्ञान अचंबित करणारे व अतुलनीय आहे.

महर्षी अमरांनी आपली शंबलाशी ओळख करून दिली आणि आपल्याला शंबला तत्त्वेही दिली. या तत्त्वांपैकी एकाचे पालन सुद्धा मुक्ती मिळविण्यासाठी पुरेसे आहे. कलियुग १९७४ मध्ये संपल्याची घोषणा देखील त्यांनी केली कारण, ज्या समारंभात ऋषींनी कलियुगाला निरोप देऊन सत्ययुगाचे स्वागत केले त्या समारंभात त्यांनी भाग घेतला होता. त्यांनी सांगितले, '१९८७ पासून प्रलयाची सुरुवात होईल.' त्याप्रमाणे प्रलयाला सुरुवात झाली आणि आपण त्याचे साक्षीदार आहोत.

महर्षी अमरांनी ध्यानसाधकांसाठी नियमित तपासणी पद्धती प्रथम सुरू केली. विद्यार्थ्याकरिता ही एक संधी असते जेव्हा तो शिक्षकांना भेटू शकतो, त्याचे अनुभव वाटू शकतो, अडचणींचे निराकरण व शंकांचे निरसन करून घेऊ शकतो आणि परत जाताना बरोबर नवीन ऊर्जा घेऊन जाऊ शकतो. 'तपासणी' हे ह्या मार्गाचे अद्वितीय वैशिष्ट्य आहे.

महर्षी अमर म्हणत असत, 'संख्या वाढवू नका.' आता माझ्या सोबत जितके लोक आहेत ते जरी खूप नसले तरी पुरेसे आहेत. आपण ह्या जगाची नवीन नियती घडवू शकतो.

महर्षी अमरांनी 'मानसी' शक्तीक्षेत्र तयार करवले. तसेच त्यांनी इतर तारामंडळातून या ठिकाणी अनेक पाहुण्यांना आणले.

त्यांची शिकवण सोपी आहे – ध्यान करा आणि सकारात्मक व्हा. सामान्य जीवन जगा, समग्रतेने व यथार्थपणे जगा, अहंकार बाजूला ठेवा आणि लौकिक आयुष्याकडे दुर्लक्ष करू नका. आजच्या दिवसासारख्या विशेष दिवशी आपण आपले जीवन पुन्हा एकदा अध्यात्म साधनेला व प्रकाशाच्या प्रकटीकरणाला वाहूया.

मी काही लोकांची निवड करून, २०१२ मधील आव्हाने पेलण्यासाठी आपल्याला जी विशेष तंत्रे देण्यात आली आहेत ती त्यांना व्यक्तिश: देईन. कालांतराने ती तंत्रे मी प्रत्येकाला देईन.

संपूर्ण जगातून स्वयंसेवक होऊ इच्छिणाऱ्या लोकांसाठी यानंतर आम्ही प्रत्येक शनिवारी या ठिकाणी सूक्ष्म स्तरावर वर्ग घेणार आहोत. तुमच्यापैकी ज्यांना ह्या वर्गात हजर राहायचे असेल ते ऋषींपाशी मानसिक पातळीवर नोंदणी करू शकतात. सूक्ष्म जगात कार्य करण्यासाठी ऋषी स्वयंसेवक निवडतील आणि त्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. या गटात सहभागी होण्याची इच्छा असणारे आपली नावे नोंदवू शकतात. या गटातील लोकांनी या पिऱ्यामिडला भेट देऊन त्या ठिकाणी काही काळ थांबावे, तेवढे पुरेसे आहे.

ज्याने ज्याने प्रकाश प्रवहन केले अशा प्रत्येक माणसाचे मी अभिनंदन करतो, कारण प्रकाश प्रवहनाचा परिणाम तुम्ही पाहू शकत आहात. अशीच आणखी पुष्कळ आंदोलने होतील, मूक क्रांती घडेल. प्रकाश लोकांच्या हृदयात पोहोचतो, संधी उपलब्ध करून देतो, सल्ला देतो, परंतु निर्णय शेवटी लोकांनी घ्यायला हवा. पुढे येणारे दिवस अतिशय आव्हानात्मक व उत्तेजित करणारे असतील. ह्या प्रक्रियांबाबत आपण जागरूक राहूया. ■

## बाहेरील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन

जे प्रत्यक्ष ध्यानवर्गात येऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी पोस्टाद्वारे किंवा ई-मेल द्वारे मार्गदर्शनाची सोय आहे. इंग्रजीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क १००० रू. व कन्नड, मराठी आणि हिंदीतून मार्गदर्शनासाठी वार्षिक शुल्क ७०० रू. आहे.

वार्षिक शुल्कात पाठ्यपुस्तकांची किंमत आणि आमच्या कुठल्याही एका भाषेतील मासिकासाठी वार्षिक वर्गणी समाविष्ट आहे.

- सर्व सूचना पोस्टाद्वारे किंवा इ-मेल द्वारे (विद्यार्थ्यांनी निवडल्याप्रमाणे) नियमित पाठवण्यात येतात.
- ऋषी स्वतः सूक्ष्मदेहाने दीक्षा देतात. आपल्या प्रगतीचे निरीक्षण सुद्धा ते सूक्ष्मदेहाने करतात.
- सगळ्या शंका आणि प्रश्नांची उत्तरं गुरुजी स्वतः देतात.
- मराठीत लिहिलेल्या पत्रांची उत्तरं श्री. जयंत देशपांडे देतात.
- मार्ग आणि साधना नीट समजून घेण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांनी आमच्या पाठ्यपुस्तकांचा आणि आमच्या इतर प्रकाशनांचा सखोल अभ्यास करावा.
- साधनेचा अहवाल आम्ही सांगितलेल्या पद्धतीने वेळेवर पाठवावा. अहवाल जर वेळेवर मिळाला नाही तर विद्यार्थ्याने ध्यान करण्याचे थांबवले आहे असे समजले जाईल.

**चेक/ड्राफ्ट "Manasa Light Age Foundation Bangalore" च्या नावाने काढावा.**

## गुरुजींकडून विशेष सूचना

- विद्यार्थ्यांनी धैर्य ठेवावे. पहिल्याच दिवशी समाधीचा अनुभव होईल, अशी अपेक्षा ठेवू नये! चमत्कारांची अपेक्षा ठेवू नये. जेव्हा आपण प्रामाणिकपणे साधना करतो तेव्हा शांतपणे चमत्कार घडतात, हे सुद्धा मात्र तेवढेच खरे आहे.
- प्रत्येकासाठी अडथळे वेगवेगळे असतात. सतत अभ्यासाने अडथळे नाहीसे होतात.
- प्रत्येकाचेच अनुभव खास असतात. तरी त्यांना खूप महत्त्व देऊ नये. ध्यान करतांना झालेले हे अनुभव छान असतात पण ते आपल्या आध्यात्मिक प्रगतीचे प्रमाण दाखवीत नसतात.
- ध्यान करतांना कार्यान्वित झालेल्या प्रक्रियांचे विश्लेषण करू नये. तसे केल्याने स्तब्धता किंवा शांतता प्रस्थापित करता येत नाही.
- ध्यान करतांना विचारांची गर्दी ही सर्वांचीच समस्या आहे. त्याबद्दल काळजी करू नये. विचारांना दूर करण्याचा प्रयत्न सुद्धा करू नये. फक्त त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. दुसरा कुठलाच उपाय नाही.

## एक भव्य जलसा

प्रगती राज, अनुवाद : वैशाली जोशी

पडदा उठला आहे आणि प्रकाश युगाकडे नेणाऱ्या कार्याची भव्य प्रक्रिया सुरू झाली आहे. प्रत्येकाने आपापले स्थान घेतले आहे आणि त्यांनी हाती घेतलेल्या कार्यात सर्वोत्कृष्ट योगदान देण्याचा प्रयत्न करीत आहेत.

मानसाचा कारभार सतत शांतपणे आणि सुरळीतपणे चालवणारा गट; आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासकेंद्रात अविरत नवनवीन सत्यांची भर घालणारा गट; प्रकाशाचे साधन बनून त्यास सर्वत्र पसरवण्यास मदत करणारे ध्यानसाधक तसेच आयुष्यातील व्यवहारात व्यग्र असून देखील केवळ प्रकाश पसरवून आणि प्रेमाचे प्रकटीकरण करून हातभार लावणारे ध्यानसाधक असे सर्व लोक आपापल्या परीने हातभार लावत आहेत. ह्यात प्रकाश प्रवहनाचे स्वयंसेवक देखील सामील आहेत, जे त्यांच्या परीने हातभार लावीत आहेत, जे दररोज शाळेतील मुलांच्या मदतीने प्रकाश खाली आणत आहेत.

ह्या भव्य जलस्यात आपल्यातील प्रत्येकासाठी एक भूमिका आहे. आपण केवळ एक ध्यानसाधक असू किंवा स्वयंसेवक असू, आपण सर्वचजण विशेष आहोत. प्रत्येकजण प्रत्येक दिवशी स्वत:ची भूमिका जबाबदारीने वठवत आहे. एक उज्ज्वल भविष्य निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी एकात्मतेने एका सुंदर गायक संघाप्रमाणे एकत्र पुढे पाऊल टाकले पाहिजे.

जसे एका संगीताच्या जलस्यात संगीतातील प्रत्येक तुकडा महत्त्वाचा असतो आणि वेगवेगळे वाद्य वाजवणारी प्रत्येक व्यक्ति महत्त्वाची असते तसेच आपल्या ह्या सुंदर मानसा कुटुंबाची प्रत्येक शाखा महत्त्वाची आहे.

उघडकीस येणाऱ्या अनेक अप्रिय वास्तवांना पाहून प्रकाश युगाची पहाट फार दूर आहे असे वाटेल. पण जेव्हा आपण लक्षपूर्वक पाहातो तेव्हा आपल्याला दिसते की प्रकाशाने दूरगामी बदल घडवून आणण्यास सुरुवात केली असून तो त्यांना पुढे नेत आहे आणि त्यामुळे नवीन काळाच्या आगमनाची आशा वाटते आहे.

वाऱ्याच्या सौम्य झुळूकेप्रमाणे एक उदात्त सूज्ञ गुरू शांतपणे मानसाच्या ह्या भव्य जलस्यातील सर्वांना मानवी स्तरावर आणि अज्ञात स्तरांवर देखील त्यांच्या भूमिका पार पाडण्यास मार्गदर्शन करीत आहेत. ■

## गुरुजींना आलेल्या पत्रांतील काही वेचे

संकलन : वैशाली जोशी, अनुवाद : एकनाथ कुलकर्णी

एका राष्ट्रीय पातळीवरील आणखी एका क्रांतीकारी चळवळीचे साक्षीदार होणे हे खूपच मार्मिक आहे. आता सर्व जगाचे डोळे भारताकडे लागले आहेत. सामूहिकरीत्या उठवलेला आवाज खूप मोठा असू शकतो व सर्व पृथ्वी-तलावर त्याचा प्रचंड प्रभाव पडू शकतो.

– पद्मजा बालाजी

आपण आम्हावर अतिशय खोलवर रुजलेला प्रभाव पाडून एक विश्वास तयार केला आहे. त्या विश्वासासोबत असलेली ऊर्जा आणि प्रेमभाव कोणत्याही परिस्थितीतून मार्ग काढण्यास पुरेसा आहे. आपल्या छत्रछायेखाली असण्याचा आनंद आणि उत्साह अभिव्यक्त करण्याचा हा एक मार्ग आहे. आपल्या कामाचा प्रचंड आवाका आणि विस्तार यांचा जितका विचार करावा तेवढे आम्ही नम्र होतो.

– उषा सतीशकुमार

आपल्याकडून आशीर्वाद ग्रहण करीत असताना मी आपल्या डोळ्यांमध्ये पाहात आहे, असे मला वाटले नाही. कारण आपल्या डोळ्यांमध्ये मी अमर्यादता, सखोलता आणि बरेचकाही पाहिले. जसे काही ते विशाल डोह असून त्यामध्ये कोणीतरी उडी सुद्धा घेऊ शकेल. त्यावेळी मी विचार करू लागले की, हे नेमके काय आहे. मला वाटले काहीतरी जादूची शक्ती असावी. परंतु आता मला समजते की ती अमर्यादता आपल्यामध्ये सतत असते. आपण सर्व पातळ्यांवर आमच्याशी संपर्क करता. आमच्या अहोभाग्यामुळेच आपण आम्हाला गुरू म्हणून लाभले आहात.

– विद्या विश्वामित्र

माझ्या या वर्षीच्या वाढदिवशी मी आपल्या आशीर्वादाची अपेक्षा केली आणि आपल्याबरोबर काम करण्याची संधी मागितली. मी सर्वप्रकारे प्रयत्न करेन. गेल्या वर्षी याच दिवशी मी तपोनगरमध्ये असण्याची इच्छा केली होती आणि या वर्षी मी येथे आहे. माझ्यासाठी ही एक विशेष देणगी आहे असे वाटते. माझ्या विवाहपूर्व दिवसांपासून आपण सदैव मला मार्गदर्शन करीत आहात. माझ्यासाठी काही काम असेल तर मला जरूर कळवावे.

– रश्मी गिरीश

तपोनगरामधील वास्तूंशी संपर्क साधल्यावर मला आपल्या आणि ऋषींच्या जवळ आल्यासारखे वाटते. आपण जे काही बोलत आला आहात, ते प्रत्यक्षात येत आहे आणि खरे ठरत आहे. पक्षांनी बोलण्याची भाषा बदलली आहे व ते स्वत:ला निराळ्या पद्धतीने व्यक्त करीत आहेत. मी बदलले आहे आणि स्वत:मध्ये काहीतरी नवीन पाहात आहे, त्यामुळे कदाचित असे होत असावे.

– जयंती नटराजन

## प्रश्नोत्तरे

संकलन: शोभा राव, अनुवाद: सुनिता देशपांडे

**प्र. गतजीवनात प्रतिगमन न करताही आपण आपल्या गतायुष्यातील स्मृतींमध्ये शिरकाव करू शकतो का?**

उ. आपण तसे करू शकतो. आपण ध्यान करून सुरुवात करायला हवी आणि त्याशिवाय काही तंत्र आहेत. सर्व स्मृती ह्या मनाच्या सुषुप्त स्तरावर असतात. आपण जेव्हा आपल्या गतजीवनाला स्वीकारण्यासाठी बऱ्यापैकी परिपक्व व खंबीर होतो, तेव्हा आपण आपल्या गतजीवनात डोकावून पाहू शकतो.

**प्र. जगापासून अलिप्तता राखण्यासाठी ध्यानाची मदत होते का?**

उ. नाही. ध्यानामुळे आपल्याला आपले ध्येय समजण्यात, आपला उगम समजण्यात आणि त्याचा साक्षात्कार होण्यास मदत होते. आपल्या आध्यात्मिक प्रगतीच्या आड येणाऱ्या सगळ्या गोष्टींपासून अंतर राखण्यात ध्यानाची आपल्याला मदत होते. त्याचप्रमाणे ध्यान अंतर कमी सुद्धा करते. आपण आपल्या आत्मस्वरूपाच्या जवळ जातो आणि त्या लोकांच्या जवळ जातो, जे आपल्याला सत्य जाणण्यात मदत करतात.

**प्र. जर मी ध्यान केले तर मला नोकरी मिळेल का?**

उ. तुम्ही जर ध्यान केले तर तुम्हाला सर्वकाही मिळेल. पण प्रत्यक्ष किंवा लगेचच नाही. ध्यान करा, करत राहा, श्रद्धा बाळगा आणि चिकाटी ठेवा.

**प्र. मी प्रकाशाला अनुभवू शकत नाही, असे का?**

उ. तुमच्याकडे प्रचंड प्रमाणात धीर असायला हवा, श्रद्धा असायला हवी आणि तुम्ही नियमितपणे ध्यान करायला हवे. तुम्हाला नक्की प्रकाशाचा अनुभव येईल. प्रकाशाचा साक्षात अनुभव येण्याआधी तुम्हाला शांती, व्यापकता अशा प्रकाशाच्या काही पैलूंचा अनुभव येईल.

**प्र. आपल्यासोबत सदैव निळ्या ऊर्जांना बाळगणे योग्य आहे का?**

उ. त्याला काहीच हरकत नाही. पण नेहमी पांढरा प्रकाश सोबत बाळगा असे मी सुचवेन.

**प्र. प्रलय-ऊर्जा फार कडक आहेत का?**

उ. त्यांना कडक असणे आवश्यक आहे. पण त्या खूप दयार्द्र पण आहेत, हे खरे आहे. त्या हरतऱ्हेने आपल्याला मार्गदर्शन आणि मदत करतात.

**प्र. विमान अपघातासारख्या अपघातांमध्ये मृत्यु होणे हे नियत असते का?**

उ. होय.

**प्र. लोक आध्यात्मिक मार्ग का बदलतात?**

उ. कदाचित त्यांना जे हवे आहे ते त्यांना त्या मार्गात मिळत नसावे. एखाद्या मार्गातील शिस्त आपण पाळू शकत नसलो तर साहजिकच आपण त्या मार्गाचा त्याग करतो. कधीकधी लोक वेगवेगळे मार्ग आजमावून पाहण्यासाठी असे करतात. पहिल्यांदा तुम्हाला काय हवे आहे, ते तुम्ही ठरवायला हवे; नंतर मार्गाचा शोध घ्यायला हवा, निवड करायला हवी आणि मग त्या मार्गाला चिकटून राहायला हवे.

**प्र. आपल्याप्रमाणे, पृथ्वीच्या आतील पोकळ भागात राहाणाऱ्या लोकांवर युगांचा परिणाम होत नाही का?**

उ. नाही. त्यांच्यावर परिणाम होत नाही, कारण ते स्पंदन लहरींच्या वेगळ्या पातळीवर राहतात.

**प्र. मानसिक संपर्क साधून मी थेट तुमच्याशी बोलू शकतो का?**

उ. होय. तुम्ही तसे करू शकता. जेव्हा तुम्ही मानसिक पातळीवर संपर्क साधता तेव्हा तुम्हाला तत्क्षणी उत्तर मिळते. कोणाशी केलेल्या मानसिक संपर्कातून मिळालेले उत्तर समजणे तितकेसे सोपे नसते. पण हार मानू नका. प्रयत्न करत राहा. केव्हानाकेव्हा तुम्हाला उत्तर समजण्यात यश मिळेल. ■


## आमची प्रकाशने

| | |
|---|---|
| Doorways to Light | 200/- |
| New Age Realities | 200/- |
| 2012 - End or Beginning | 100/- |
| iGuruji - Vol 1 | 150/- |
| iGuruji - Vol 2 | 120/- |
| iGuruji - Vol 3 | 150/- |
| iGuruji - Vol 4 | 150/- |
| iGuruji - Vol 5 | 100/- |
| Higher Communication & Other Realities | 100/- |
| Living in the Light of My Guru | 220/- |
| How to Meditate | 50/- |
| Dhyana Yoga | 50/- |
| Descent of Soul | 50/- |
| Practising Shambala Principles | 50/- |
| Astral Ventures of A Modern Rishi | 50/- |
| Channelled Knowledge from the Rishis | 250/- |
| Channelled Knowledge from the Rishis Vol-2 | 150/- |
| Guruji Speaks Part - I | 200/- |
| Guruji Speaks Part - II | 200/- |
| Guruji Speaks Vol - 3 | 150/- |
| Guruji Speaks Vol - 4 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 1 | 200/- |
| The Book of Reflections - Vol 2 | 200/- |
| Meditators on Meditations | 75/- |
| Meditators on Experiences | 75/- |
| Meditational Experiences | 150/- |
| Awareness | 60/- |
| Living in Light | 10/- |
| Light | 10/- |
| ऋषींकडून मिळालेले ज्ञान (Marathi) | 200/- |
| प्रकाशवाट (Marathi) | 150/- |
| २०१२ – अंत की आरंभ? (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| आयगुरूजी (Marathi) | 100/- |
| ध्यान कसे करावे (Marathi) | 50/- |
| ध्यानयोग (Marathi) | 50/- |
| आत्म्याचे पृथ्वीवर अवतरण (Marathi) | 50/- |
| शंबला तत्त्वांचा अभ्यास (Marathi) | 50/- |
| एका आधुनिक ऋषीचे सूक्ष्मजगातील पराक्रम (Marathi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Marathi) | 10/- |
| प्रकाश (Marathi) | 10/- |
| उच्चस्तरीय संवाद आणि इतर सत्ये (Marathi) | 100/- |
| २०१२ सालाची तयारी (Marathi) | 100/- |
| ध्यान कैसे करे (Hindi) | 50/- |
| ध्यान-योग (Hindi) | 50/- |
| प्रकाशमय जीवन (Hindi) | 10/- |
| प्रकाश (Hindi) | 10/- |
| प्रकाश की ओर (Hindi) | 150/- |

### ही पुस्तके खालील ठिकाणी मिळतील:

**मुंबई:** चेतना बुक सेन्टर, फोर्ट (फोन:२२८५१२४३)

मेजस्टिक एजन्सीज, विले पार्ले (पू) (फोन: २६१३२८७९)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, डोंबिवलि (पू) (फोन: ०२५१-२८६-१८९०/२४४-९५८५)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, गोरेगाव (प) (फोन: २८७६७२९८)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, माटुंगा (फोन: २४१२२३१६, २४१४१३४४)

गिरि ट्रेडिंग एजन्सी, नवी मुंबई (फोन:३२५२२४९१)

**पुणे:** संस्कृती प्रकाशन, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४९७३४३)

द इंटरनॅशनल बुक सर्विस, डेक्कन जिमखाना (फोन: २५६७७४०५)

द वर्ड बुक शॉप, कँप (फोन: २६१३३११८, ३०५८००१०/११, ९३७०६७८११३/४)

उज्वल ग्रंथ भंडार, आप्पा बळवंत चौक (फोन: २४४५६९०८, ६५२२६१३७)

यशवंत प्रकाशन, सदाशिव पेठ (फोन:२४४७०५३३)

**नागपुर:** दिलीप बुक एजन्सी, मेडिकल चौक (फोन: ६५९५०३२)

RNI. No. KARMAR/2008/27314 Registered Postal Regn. No. L/CNA/68/2010-11
Date of posting Newsletter-25th of Every Month. Posted at Bangalore GPO No. of Pages-8



गुरुजी कृष्णानंद (१९३९)

## मानसा फाउंडेशन (रजि)

प्रकाशाच्या कार्याशी निगडित आहे आणि तपोनगरात आणि बंगलोर शहरात ध्यानवर्ग चालवण्याचे कार्य करते. गुरुजी कृष्णानंदांनी १९८८ मधे ह्या संस्थेची स्थापना केली.

## मानसा

बंगलोर पासून २० कि.मी. अंतरावर आहे. ही ध्यान करणाऱ्यांची एक उमलती जागा आहे. महर्षी अमरांना १९३५ साली इथे ऋषींच्या कार्यासंबंधी आणि प्रकाशाच्या एका आगामी शहराबद्दल साक्षात्कार झाला होता.

इथे कॉस्मिक टॉवर, कुंडलिनी मंदिर आणि तपोवन या ध्यान करण्यासाठी विशिष्ट जागा आहेत.

इथे "मानसी" नावाचे एक विशेष शक्तीक्षेत्र तपोनगराच्या सभोवताली ऋषींनी प्रस्थापित केले आहे आणि विशेष शक्ती इथे गोळा करून ठेवल्या आहेत.

## अंतरमानसा

मानसाचे जन्मस्थान, तपोनगरच्या १ कि.मी. पलीकडे, नाडगौडा गोलाहल्ली नावाच्या गावात आहे. इथे एक झोपडी आणि इतर अशा जागा आहेत ज्यांच्यात गुरुजी १९८७ ते १९९२ पर्यंत राहिले होते.

## स्टडी सेंटर

हे अंतरमानसा येथे, ऋषींच्या मार्गदर्शनाखाली आध्यात्मिक सत्यांच्या अभ्यासासाठी असलेले, एक विशेष केंद्र आहे.

## ज्योती प्रॉजेक्ट

मुख्यत्वेकरून गावातल्या मुलांसाठी आहे. मुलांना शाळेतल्या त्यांच्या अभ्यासात मदत केली जाते आणि त्यांना श्लोक, भजन, स्वच्छता, सामान्य ज्ञान आणि कंप्यूटरचे प्रशिक्षण दिले जाते. ड्राइंग, पेंटिंग आणि गोष्टी सांगण्याच्या कलेतून व्यक्त करण्यासाठी, त्यांना प्रोत्साहित केले जाते.

## भेट देणाऱ्यांसाठी

दररोज सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत सर्वांना ध्यानासाठी परवानगी आहे

## अपील

कृपया आमच्या सेवेस मदत करावी. चेक/ड्राफ्ट मानसा फाउंडेशनच्या नावाने काढावा. ८०-जी अंतर्गत आयकरात सूट मिळेल.

# आध्यात्मिक अनुभव

(संकलन: शोभा राव, अनुवाद: गुरुराज कानाडे)

सूक्ष्म पातळीवर मला एक अतिशय महान अनुभव आला. संपूर्ण विश्व मला आपल्या मिठीत घेत होते. या मुक्त, सुखदायक, लहान मुलासम निरागस अनुभवाचा आनंद मी घेतला. मला जाणवले की, मी कोण आहे, मी काय करते याची पर्वा न करता हे विश्व नेहमीच मला आपल्या कवेत घेते. या जाणिवेने मी भारावून गेले. सभोवतालचे लोक कोण आहेत किंवा ते काय करतात याची पर्वा न करता, मी प्रत्येकातील परमेश्वरी अंशाशी नाते जोडते आहे. अशा रीतीने जगणे किती सुंदर आहे! मला कशातच कसलाही बेबनाव जाणवत नाही किंवा कोणतीही गोष्ट नाट्यमय वाटत नाही.

ऋषींशी संपर्क सत्रादरम्यान काही काळ एक शक्तिशाली प्रक्रिया घडते. त्यानंतर मी गडद निळ्या शक्तींच्या महासागराशी एकरूप होते. तेथे विस्तारित व जागृत अवस्थेत, मी माझ्या अंतरंगात लक्ष केंद्रित करून प्रतीक्षा करत असते. अंतरंगात मला एक शक्ती जाणवते, गुरुजी, ऋषी व परमेश्वराचे अस्तित्व जाणवते.

– विद्या विश्वामित्र

गहन पातळीची स्तब्धता व शांततेचा अनुभव मी घेते आहे. मला परिपूर्ण झाल्यासारखे वाटते आहे आणि एकत्वाचा अनुभव अगदी नैसर्गिकपणे येतो. सर्वप्रकारचा दुरावा व विभक्तपणा जणूकाही नाहीसा झाला आहे. मला प्रयत्नपूर्वक संपर्क साधण्याची व प्रार्थना करण्याची गरज वाटत नाही कारण ते आपोआपच घडते. शब्दात मांडता येणार नाही अशा तृप्तीचा अनुभव मला येतो. प्रत्येक गोष्टीत इतके सौंदर्य व आनंद आहे. माझ्या दैनंदिन कामादरम्यान मी स्तब्धता अनुभवते आणि या स्तब्ध क्षणांमध्ये असलेल्या अद्‌भुत चैतन्यशक्तीचे कुतूहल मला वाटते.

– उषा सतीशचंद्रा

मी विश्वामित्र महर्षींशी संपर्क करण्याचा प्रयत्न करीत होतो पण मला माझ्या प्रश्नांची उत्तरे मिळत नव्हती. मग मी महर्षींची प्रार्थना केली व झोपलो. मी त्यांना प्रार्थना केली की त्यांचा संदेश मला समजण्यासाठी त्यांनी मला मदत करावी. पहाटे मला स्वप्न पडले, ते दुसऱ्या दिवशी खरे ठरले! माझ्या जीवनातील महर्षींच्या उपस्थितीच्या जाणिवेने, मी खूप आनंदी आहे.

– अभय जोशी

गुरुपौर्णिमे दिवशी मला गुरुजींची व मानसाची राहून राहून आठवण येत होती. मी कोरामंगला येथील ध्यान केंद्रात गेलो. तेथे जात असताना मला गुरुजींची उपस्थिती जाणवली व त्यांचा स्मित करीत असलेला चेहरा देखील मला दिसला. गहन ध्यान करून मी त्यांच्याप्रती माझी कृतज्ञता व्यक्त केली. मला समजले की, मी बदललो तर जग देखील बदलेल. दुसऱ्या दिवशी पहाटे मी स्वतःला सूक्ष्म पातळीवर गुरुजींसोबत ध्यान करत बसलेले पाहिले.

– रवी जी. एच.

अभ्यासाला बसण्यापूर्वी काही मिनिटांसाठी डोक्यात पांढरा प्रकाश भरण्याच्या तंत्राचा अभ्यास करण्यास माझ्या आईने मला सांगितले. मी या तंत्राच्या अभ्यासास सुरुवात केली. हे तंत्र मी गेले वर्षभर अभ्यासत आहे. मी अभ्यासात बरीच प्रगती केली आहे आणि या वर्षी आमच्या महाविद्यालयात मला उच्च श्रेणी देखील प्राप्त झाली आहे.

– काव्याश्री आर.

आजकाल अंतरंगात स्तब्धता शोधणे अगदी सोपे झाले आहे. एका ध्यानसत्रादरम्यान मला काही क्षणांसाठी गहन स्तब्धतेचा अनुभव आला. त्या क्षणांदरम्यान मला या जगातील कशाचेच महत्त्व वाटत नव्हते. दृश्यांऐवजी जवळपास सारेच अनुभव मला जाणिवांच्या स्वरूपात येतात. मला शंबलेतील महात्म्यांशी देखील जवळीक जाणवते.

– गीता बालकृष्णन

मी व माझी मैत्रीण रात्री ११ च्या सुमारास इटली येथील एका सुनसान रेल्वे स्थानकावर अडकून पडलो होतो. काळोख दाटला होता, पाऊस पडत होता व एका विजेच्या दिव्याच्या खांबा व्यतिरिक्त दुसरे काहीही दृष्टीपथात नव्हते. मदती करिता मी मनात प्रकाशाची प्रार्थना केली. मी प्रार्थना करताच एक स्त्री अचानकपणे तेथे आली. ती आमच्या जवळ उभी राहिली. इतकेच नव्हे तर तिने आमच्याकरिता आगगाडीचा दरवाजा देखील उघडला ! दैवी प्रकाश सदैव माझ्या सोबत असतो व माझे मार्गदर्शन करतो.

– हिला माझ्दा

PRAKASHMARG A Marathi Monthly Newspaper, Annual Subscription: Rs. 200/-
Printed, Published and Edited by Jayant Deshpande on behalf of Manasa Foundation (R).
Published from Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077 and
Printed at M/s. ART PRINT, Dr. Modi Hospital Main, WOC Road, Bangalore-86. Phone : 2335 9992
Owner: Manasa Foundation (R), Taponagara, Chikkagubbi, (off Hennur-Bagalur Road), Bangalore Urban - 560 077.
Editor : Jayant Deshpande